बालकामगार कल्याण योजना (Scheme for Welfare of working Children) या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी सन २०१६-१७ चा निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक - डब्ल्युडब्ल्युसी-२०१८/प्र.क्र.०१/का-०३
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २८ मार्च, २०१९.

<u>वाचा</u> :- १. महिला व बाल विकास मंत्रालय, केंद्र शासन यांचे क्र. एफ क्र. १-२/२००७-सीडल्ब्यु-॥ दि. १३.०१.२०१७ चे पत्र
२ महिला व बाल विकास मंत्रालय, केंद्र शासन यांचे क्र. एफ क्र. १-२/२००७-सीडल्ब्यु-॥ (पीटी),दि. ३१.०१.२०१७ चे पत्र
३. महिला व बाल विकास मंत्रालय, केंद्र शासन यांचे क्र. एफ क्र. १-२/२००७-सीडल्ब्यु-॥ दि. ३१.०१.२०१७ चे पत्र
४. महिला व बाल विकास मंत्रालय, केंद्र शासन यांचे क्र. एफ क्र. १-२/२००७-सीडल्ब्यु-॥ दि. १९.०३.२०१९ चे पत्र.
५. शासन निर्णय , महिला व बाल विकास विभाग क्रमांक डब्ल्युडब्ल्युसी-२०१८/प्रक्र.०१/का.०३ दि. २३.०८.२०१८.

<u>प्रस्तावना</u> :- केंद्र शासन पुरस्कृत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी “बालकामगार कल्याण योजना (Scheme for Welfare of working Children)” ही योजना राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत होती. सदरील योजनेंतर्गत मान्यता प्राप्त संस्थांमार्फत बाल कामगार, शाळाबाह्य मुले, वाहन दुरुस्ती/गॅरेजवर काम करणारी मुलेस, घरकाम करणारी मुले इ. लाभार्थ्यांना अनौपचारिक शिक्षण, व्यवसाय व प्रशिक्षण देवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले जाते. या योजनेंतर्गत प्रशिक्षण कालावधी दरम्यान संस्थेतील लाभार्थ्यांना अल्पोपहार, वैद्यकीय सुविधा, मनोरंजन, क्रिडा सुविधा इ. सुविधा पुरविल्या जातात. व त्यांचे पुनर्वसन केले जाते. सदर योजनेअंतर्गत केंद्रशासन व संबंधित स्वंयसेवी संस्था यांचा हिस्सा ९०:१० असा असून राज्य शासनाकडून संबंधित संस्थांची शिफारस केंद्र शासनास करण्यात येत होती. त्यानुसार केंद्राकडून संबंधित संस्थेस दोन हप्त्यांमध्ये (प्रत्येकी ४,६५,६८०/-) थेट अनुदान वितरीत करण्यात येत होते.

तथापि, संदर्भीय क्र २ च्या पत्रान्वये सदर योजना सन १ एप्रिल,२०१७ पासून बंद करण्यात आली आहे. तसेच संदर्भीय क्र. ४ नुसार सन २०१६ -१७ मध्ये कार्यरत असणा-या संस्थांना देय असणारा अनुदानाचा निधी (एकूण रु १,६७,८३,१२८/-) राज्य स्तरावरून वितरीत करणेसाठी राज्य शासनास उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या संदर्भीय क्र. ४ मधील प्राप्त यादीतील १८ संस्थांना देय असणारा (एकूण रु. १,६७,८३,१२८/-) इतका निधी २२३५ सी ११६ या लेखाशिर्षाखाली आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः-

केंद्र शासन पुरस्कृत “बालकामगार कल्याण योजना (Scheme for Welfare of working Children)” योजनेंतर्गत कार्यरत संस्थांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमधील अटीच्या अधीन २२३५ सी ११६ या लेखाशीर्षाखाली सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ** मधील १८ संस्थांना एकूण रु.१,६७,८३,१२८/- (अक्षरी रु.एक कोटी, सदुसष्ट लाख, त्र्याऐंशी हजार, एकशे अठ्ठावीस फक्त) इतका निधी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त प्रयोजनाकरिता आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना संनियंत्रक तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी विहित नियमानुसार सदर निधी वितरीत करावा. तसेच सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात यावे.

अनुदान वितरणाच्या अटी व शर्तीः- उपरोक्त योजनेच्या निधी वितरीत करतांना खालील अटींचे पालन करणे व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना व विहित तरतूदींचे अनुपालन करणे आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना बंधनकारक राहील.

१. बाल कामगार कल्याण योजनेच्या अनुषंगाने पात्रता निकष पुर्ण करणे आवश्यक राहील.
२. मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार प्रकल्प त्याच कार्यक्षेत्रात कार्यरत असावा.
३. अनुदान ज्या घटकांसाठी मंजूर करण्यात आले आहे. त्याच घटकांसाठी खर्च करण्यात यावा.
४. मागील अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
५. नीती आयोगाचे NGO PS- Portal च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.
६. सदर योजनेंतर्गत मंजूर अनुदानाची रक्कम आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या स्तरावरून संबंधीत स्वयंसेवी संस्थेच्यध बँक खात्यामध्ये ECS व्दारे (ऑनलाईन) थेट जमा करण्यात यावी.
७. सदर योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थांना शासन निर्णय निर्गमीत झाल्याच्या एका आठवड्याच्या आत निधी वितरीत करणेबाबतची व त्याची यादी शासनास उपलब्ध करणेबाबतची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी घ्यावी. तसेच याबाबतचे लेखे स्वतंत्र ठेवून खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व तपशील शासनास सादर करण्यात यावा.
८. बाल कामगार कल्याण योजनेंतर्गत संस्थांना देय असणारा निधी वितरीत करतांना सदर संस्थांना इतर योजनांमधून याच लाभार्थ्यांसाठी निधी उपलब्ध केला जाणार नाही याची खातरजमा करण्यात यावी.
९. प्रस्तुत संस्थांना प्रत्यक्ष खर्चानुसार देय असणारा निधी वितरीत करुन उर्वरीत निधी प्रत्यार्पित करण्याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास यांनी घ्यावी .

२. हा खर्च मागणी क्रमांक एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १९९ अशासकीय संस्थांना सहाय्य, (००)(०४) बाल कामगार कल्याण योजना (केंद्र हिस्सा ९० टक्के), (२२३५ सी ११६) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर असलेल्या तरतुदीतुन भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं- २०१८/प्र.क्र ६९ /अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. १५४/अर्थोपाय, दि.२६.०३.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३२९१०५९०९५३३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.03.29 11:30:57 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
३) महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर.
७) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग.
१०) निवड नस्ती, का-३.

प्रपत्र - अ

बाल कामगार योजनेंतर्गत कार्यरत संस्थांना निधी वितरण (सन २०१६-१७)

अ.क्र.	संस्थेचे नाव	वितरीत करावयाची रक्कम रुपये (सन २०१६-१७)
१	बालाजी सेवा प्रतिष्ठान, जि. लातूर	९,३३,१२०/-
२	नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण प्रसारक मंडळ, जालना	९,३३,१२०/-
३	श्री. साई सेवाभावी संस्था, जि. लातूर	९,३३,१२०/-
४	जिजामाता बहुउद्देशिय महिला मंडळ, जि. लातूर	९,३३,१२०/-
५	वर्ल्ड सोशल फाऊंडेशन, उस्मानाबाद	९,३३,१२०/-
६	मानव जिवन विकास प्रतिष्ठान, अहमदपूर, जि. लातूर	९,३३,१२०/-
७	मधुमती महिला मंडळ, जि. लातूर	९,३३,१२०/-
८	सत्यमेव जयते सेवाभावी संस्था, उस्मानाबाद	९,३३,१२०/-
९	भावना एज्युकेशन सोसायटी, जि. लातूर	९,३३,१२०/-
१०	युथ चाईल्ड एन्ड कल्चरल ऑर्गनायझेशन, उस्मानाबाद	९,३३,१२०/-
११	शांती निकेतन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी	९,३३,१२०/-
१२	राधा राणी बहुउद्देशिय विकास प्रतिष्ठान, परभणी	९,३१,७४१/-
१३	माता जिजाई बहुउद्देशिय विकास महिला मंडळ, परभणी	९,३३,१२०/-
१४	अहिल्या बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, जि. लातूर	९,२१,४६७/-
१५	उज्ज्वल गोंडवाना महिला मंडळ नागपूर,	९,३३,१२०/-
१६	श्री. भैरोनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, हिंगोली	९,३३,१२०/-
१७	ज्योतिबा फुले सेवा ट्रस्ट , नांदेड वर्धा जिल्ह्याकरिता	९,३३,१२०/-
१८	अहिल्या शिक्षण प्रसारक व बहुउद्देशिय मंडळ , वाशिम.	९,३३,१२०/-
	एकूण	**१,६७,८३,१२८/-**